प्रेस नोट दि. २०/०२/२०२६

| | | |
|---|---|---|
| १. | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | लातूर. |
| २. | पोलीस स्टेशन | विवेकानंद चौक लातूर, जि. लातुर |
| ३. | कलम | कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ अन्वये |
| ४. | तक्रारदार | पुरूष, वय २८ वर्षे, रा. मातृछाया बॉईज हॉस्टेल, हाके नगर, लातूर जि. लातूर |
| ५. | फिर्यादी :– सरकारतर्फे | संतोष धनसिंग बर्गे, पोलीस उपअधीक्षक, लाप्रवि., लातूर |
| ६ | आरोपी लोकसेवक | शंकर रमेश कराड, वय ४१ वर्ष, पद– लिपिक व टंकलेखक (गट क), नेमणूक–कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग, क्रमांक–१, लातूर, जिल्हा लातूर |
| ७. | गुन्हा घडला ता. वेळ व ठिकाण | दि. २०/०२/२०२६ रोजी १२.०५ वा, पाटबंधारे विभाग, क्रमांक–१, लातूर येथे आलोसे यांचे कार्यालयात |
| ९. | मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रू. |
| १०. | स्विकारलेली लाचेची रक्कम | ५,०००/– रू. |
| ११. | थोडक्यात हकिकत :– यातील तक्रारदार यांनी दि. १८/०२/२०२६ रोजी तक्रार दिली कि, त्यांचे हॉस्टेल पाटबंधारे विभाग लातूर येथील विभागीय क्रीडा स्पर्धेसाठी येणारे कर्मचारी स्पर्धक यांना दिनांक १७/०१/२०२६ ते दिनांक १९/१/२०२६ या काळात राहण्यासाठी अधिग्रहण करून दिलेले होते. सदर स्पर्धकांचे तीन दिवसाचे राहण्याचे बिल मिळणे बाबत तक्रारदार हे पाटबंधारे विभाग लातूर क्रमांक १ येथील कर्मचारी श्री कराड यांना दिनांक १८ /०२/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता भेटले असता त्यांनी तक्रारदार यांचे बिलाचा ३५,८६०/– रुपयाचा चेक दिला व सदर चेक दिल्याचे बक्षीस म्हणून तक्रारदार यांना ७,०००/– रुपयांची लाच मागणी केली आहे. दिनांक १८/०२/२०२६ रोजी पाटबंधारे विभाग लातूर, क्रमांक १, येथील लिपिक कराड यांच्या कार्यालयात तक्रारदार यांचे कामासाठी आलोसे लिपिक श्री कराड यांनी पंचासमक्ष ५,०००/– रू. लाचेची मागणी केल्याचे पडताळणी दरम्यान निष्पन्न झाले आहे.<br>दि. २०/०२/२०२६ रोजी १२.०५ वाजता सापळा कार्यवाही आजमावली असता लिपिक श्री शंकर कराड यांनी तक्रारदार यांच्याकडून मागणी केलेली ५,०००/– रू लाच रक्कम पाटबंधारे विभाग लातूर, क्रमांक–१ येथे स्वत:चे कार्यालयात साहेबांना द्यायचे आहेत असे सांगून पंचासमक्ष १२.१५ वाजता स्विकारली आहे.<br>आरोपी लोकसेवक शंकर रमेश कराड, वय ४१ वर्ष, पद– लिपिक व टंकलेखक (गट क), नेमणूक–कार्यकारी अभियंता पाटबंधारे विभाग क्रमांक १ लातूर, जिल्हा लातूर यांचेविरूध्द पोलीस स्टेशन विवेकानंद चौक लातूर, जि.लातूर येथे कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८. अन्वये गुन्हा नोंद करण्याची कार्यवाही सुरू आहे. सदर गुन्हयाचा तपास विशाल बहात्तरे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. लातूर हे करीत आहेत. | |

सदर सापळा कार्यवाही मा. श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक, श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, नांदेड परिक्षेत्र, नांदेड, यांचे मार्गदर्शनानूसार ला.प्र.वि. लातुर चे पोलीस उप अधीक्षक संतोष बर्गे, पोलीस निरीक्षक विशाल बहात्तरे, पोह/फारूक दामटे, भागवत कठारे, शाम गिरी, भिमराव आलुरे, पोकॉ/मंगेश कोंडरे, पोकॉ/दिपक कलवले, पोकॉ/गंभीरे, पोकॉ/शिवराज गायकवाड, मपोकॉ/शाहाजान पठाण, मपोकॉ/परविन तांबोळी, यांनी पार पाडली आहे.

तरी सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, शासकीय अधिकारी/कर्मचारी हे शासकीय काम करण्यासाठी लाचेची मागणी करीत असल्यास तसेच त्यांचे लाचेच्या मागणी संदर्भात खालील क्रमांकावर संपर्क करावा.

| | | | |
|---|---|---|---|
| १) | श्री. संदीप पालवे, पोलीस अधीक्षक | :– | ०२४६२–२५५८११ मोबाईल क्रमांक –९२२६४८४६९९ |
| २) | श्री. अशोक कदम, अपर पोलीस अधीक्षक | :– | ०२४६२–२५५८११ |
| ३) | श्री. संतोष बर्गे, पोलीस उप अधीक्षक | :– | मोबाईल क्रमांक –९२२६२०१०६४ |
| ४) | टोल फ्री | :– | १०६४ |
| ५) | ला.प्र.वि.,लातुर कार्यालय फोन क्रमांक | :– | ०२३८२–२४२६७४ |
| ६) | Website | :– | www.acbmaharashtra.gov.in |
| ७) | Mobile App | :– | www.acbmaharashtra.net |
| ८) | Facebook Page | :– | www.facebook.com/maharashtraACB |
| ९) | 8 Twitter | :– | ACBlatur |
| १०) | Instagram | :– | Acblatur |
| ११) | YouTube Channel | :– | anticurruptionbureaulatur1584 |

पोलीस उपअधिक्षक
सत्यमेव जयते
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

(संतोष ध.बर्गे)
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, लातूर

Scanned with OKEN Scanner